**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (पूर्व),**
**ता. वसई, जि. पालघर - ४०१ ३०५.**

वसई-विरार शहर महानगरपालिका
स्थापना : ३ जुलै २००९

दूरध्वनी : ०२५० - २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६
फॅक्स : ०२५० - २५२५१०७
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com


जावक क्र. : व.वि.श.म./आरोग्य/२८८/22
दिनांक : १४/07/22

# जाहिर दरपत्रक

दुर्गंधीनाशक पावडर (Deodorizing cum dusting powder) विक्री करणारे विक्रेते, पुरवठादार, संस्था व व्यक्ती यांना कळविण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील दैनंदिन कचरा संकलन करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या डस्टबीन्स मधून येणाऱ्या दुर्गंधीसाठी दुर्गंधी नाशक पावडर खरेदी करायचे असून त्याकरिता दि.१५/०७/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून दि.२५/०७/२०२२ पर्यंत दुपारी ३.०० वाजेपर्यंत बंद पाकीटातून दरपत्रक (कोटेशन) मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | दुर्गंधीनाशक पावडरचे नाव | आवश्यक प्रमाण/ किलो | प्रति किलो दर (GST सह) |
|---|---|---|---|
| १ | दुर्गंधीनाशक पावडर (Deodorizing cum dusting powder) | १० टन | |

**अटी-शर्ती**

१. पुरवठादराने स्वत:चे लेटरपॅडवर दरपत्रक सादर करावे. दरपत्रकावर GST क्रमांक असणे बंधनकारक राहील.
२. शॉप ॲक्ट लायसन्स (छायांकित प्रत) आवश्यक आहे.
३. पॅनकार्ड (छायांकित प्रत) आवश्यक आहे.
४. आधारकार्ड (छायांकित प्रत) आवश्यक आहे.
५. भारत सरकार सुक्ष्म, लघु एवं मध्यम उद्यम मंत्रालय यांचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
६. भारत सरकारच्या कारपोरेट कार्य मंत्रालय (एम.सी.ए.) यांचे निगमन प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
७. पुरवठा आदेश असल्यास सादर करावा.
८. दरपत्रक सादर करताना रक्कम रु.८,०१७/- इतक्या रक्कमेचा डि.डि. इसारा रक्कम म्हणून दरपत्रकासोबत जोडावा.
९. दरपत्रक मुदतीमध्ये व वेळेमध्ये मुख्य कार्यालय विरार येथील आवक-जावक विभागात सादर करणे बंधनकारक राहील.
१०. दरपत्रकास मंजुरी दिल्यानंतर कार्यालयात उपस्थीत राहून रु.१००/- चे करारपत्रावर करारनामा लिहून देण्याचा आहे. मुदतीत करारनामा न केल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.
११. मनपाकडे ३% सुरक्षा अनामत रक्कम भरणा करणे बंधनकारक राहील.
१२. दरपत्रकात नमुद वस्तुंचे/साहित्यांचे दर हे सादर करताना सर्व करासहित व वाहतूक खर्चासहित दर दर्शविण्यात यावेत.
१३. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारणेचा अथवा नकारणेचा अधिकार मा.अति आयुक्त यांना राहील.
१४. वरील अटींचे पालन जे पुरवठादार करणार नाहीत त्यांचे दरपत्रक पडताळणी अंती अपात्र ठरविण्यात येतील.
१५. यासंबंधीची दरपत्रक स्वत:चे लेटरहेड वर बंद पाकीटातून दि.१५/०७/२०२२ रोजी ते दि.२५/०७/२०२२ रोजी पर्यंत दुपारी ३.०० वाजेपर्यंत मुख्य कार्यालय विरार येथील आवक-जावक विभागामध्ये सादर करावीत.
१६. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दि.२६/०७/२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजता मा.उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन विभाग) यांचे दालनात उपस्थित दरपत्रकादार अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

**(डॉ.चारुशिला पंडीत)**
**उपायुक्त**
**घनकचरा व्यवस्थापन विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**